प्रेस नोट दि - ११/०५/२०१९

---

## सराईत गुन्हेगार जेरबंद, दोन पिस्टल व चार काडतुसे हस्तगत

---

दिनांक - १०/०५/२०१९ रोजी गुन्हे शाखा युनिट ३ पुणे येथील अधिकारी व कर्मचारी हददीमध्ये गस्त घालत असताना पोहवा/संताषे क्षीरसागर यांना त्यांचे खब-याकडुन बातमी मिळाली की एलोरा लॉज समोर, सदाशिव पेठ पुणे येथील सार्वजनिक रोडचे कडेला पोलीस अभिलेखा वरील सराईत गुन्हेगार अजय पांचाळ रा. जांभूळ वाडी रोड, आंबेगांव खुर्द, ता हवेली जि पुणे हा आपले जवळील पिस्टल विकण्यासाठी येणार आहे. त्यावरुन पोलीसांनी सदर ठिकाणी सापळा रचून सराईत गुन्हेगार अजय विजय पांचाळ वय २७ रा.चाळ नं ३, खोली नं २, शनिनगर जांभूळ वाडी रोड, आंबेगांव खुर्द, ता हवेली जि पुणे यास ताब्यात घेण्यात आले. त्याचे ताब्यातून दोन देशी बनावटीचे पिस्टल व चार जिवंत काडतुसे असा एकूण एक लाख बेचाळीस हजार पन्नास रुपयेचा माल जप्त करण्यात आलेला आहे.

आरोपी अजय विजय पांचाळ हा पोलीस अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. त्याचे विरुध्द यापुर्वी दत्तवाडी पोलीस स्टेशन व भारती विद्यापिठ पोलीस स्टेशन,हवेली पोलीस स्टेशन या ठिकाणी खुन, खुनाचा प्रयत्न, दुखापत,घातकशस्त्र जवळ बाळगणे असे चार गुन्हे दाखल आहेत. त्याने अल्पवयातच खुनाचा गुन्हा केला होता.

सदर बाबत दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर २४४/२०१९ आर्म ॲक्ट कलम ३, ५, २५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशा प्रकारे त्याने आणखी पिस्टल व काडतुसे कोणा, कोणाला विकली आहे. ती कोठून खरेदी केली आहेत. तसेच त्याचे इतर साथीदार कोण आहेत याबाबत तपास चालू आहे. आरोपीस दि.१५/०५/२०१९ रोजी पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो, कोर्ट नं.२ शि.नगर पुणे यांनी दिलेले आहेत.

सदरची कामगिरी गुन्हे शाखा, पुणे शहरचे अपर पोलीस आयुक्त गुन्हे प्रदिप देशपांडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे शहर श्री. शिरीष सरदेशपांडे, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे - १ पुणे श्री. समीर शेख यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट - ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. दिपक निकम, पोलीस उप निरी श्री. संजय गायकवाड, किरण अडागळे, व पोलीस कर्मचारी सहायक पोलीस फौजदार दत्तात्रय गरुड, पोहवा/संतोष क्षीसागर, पोहवा/मच्छिंद्र वाळके, पोहवा/गजानन गाणबोटे, पो.ना.अतुल साठे, संदीप राठोड, चालक पो.ना.सुजित पवार यांनी केली असून पुढील अधिक तपास पोलीस उप निरीक्षक संजय गायकवाड हे करीत आहेत.